मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्याच्या नागरी भागातील फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही/उपाययोजना करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग,

मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२

शासन निर्णय क्र. राफेधो-२०१३/प्र.क्र. ३९/नवि-३४

दि. २१ ऑक्टोबर, २०१३

***पहा*** — १) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. बीएमसी-२००६/प्र.क्र. १०९/नवि-२१, दि. १७ जुलै, २००६

२) शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक राफेधो- ०३०९/प्र.क्र २०/नवि-३४, दि. ०२ मार्च, २००९.

३) मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. १३ सप्टेंबर, २०१३ चे आदेश.

***प्रस्तावना :*** केंद्र शासनाच्या नगर विकास व दारिद्रय निर्मूलन मंत्रालयाने सन २००४ साली नागरी क्षेत्रातील रस्त्यावरील किरकोळ विक्रेत्याबाबत **"राष्ट्रीय फेरीवाला धोरण"** जाहीर केले होते. सदरहू फेरीवाला धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी व याबाबत शासनास सल्ला देण्यासाठी शासनाने प्रधान सचिव (नवि-२) यांच्या अध्यक्षतेखाली उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये एक राज्यस्तरीय समिती गठीत केली होती. सदरहू समितीने राज्यात **राष्ट्रीय फेरीवाला धोरण** लागू करण्याच्या दृष्टीने राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका अधिनियमात तसेच मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यामध्ये आवश्यक सुधारणांचा मसुदा व फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियमन करण्यासाठी आदर्श उपविधी तयार करुन शासनास सादर केले. शासनाने काही सुधारणांसह या उपविधीस मान्यता दिली आहे.

शासनाने संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियमन करण्यासाठी आदर्श उपविधीच्या धर्तीवर स्थानिक परिस्थितीनुसार उचित फेरफार करुन उपविधी तयार करुन शासनाच्या पूर्व मान्यतेने आपआपल्या क्षेत्रात लागू करण्याचे आदेश निर्गमीत केले आहेत.

आता मा. सर्वोच्च न्यायालयाने **"महाराष्ट्र एकता हॉकर्स"** संघटना विरुद्ध बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विविध अपिल प्रकरणामध्ये (सिव्हिल अपिल क्रमांक ४१५६-४१५७/२००२, सिव्हील अपिल क्र. ४१६१-४१६२/२००२, सिव्हील अपिल क्र. ४१७५-४१७६/२००२ सिव्हील अपिल क्र. व इतर) दि. ०९ सप्टेंबर, २०१३ रोजी असे आदेश दिले आहेत की, केंद्र शासनाचे



Generated by CamScanner from intsig.com

नागरी भागातील फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही सर्व राज्य शासनांनी त्वरीत सुरु करावी.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०९ सप्टेंबर, २०१३ रोजी दिलेले आदेश विचारात घेवून **शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. राफेधो-०३०९/प्र.क्र. २०/ नवि-३४, दि. ०२ मार्च, २००९** व यापूर्वी यासंदर्भात देण्यात आलेले सर्व आदेश अधिक्रमीत करुन केंद्र शासनाच्या **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** ची राज्यात अंमलबजावणी करण्याकरीता राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपालिका यांना निदेश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## *शासन निर्णय-:*

मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. ०९ सप्टेंबर, २०१३ चे आदेश विचारात घेवून राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपालिका यांना पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत -----

१. **राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपालिका यांनी राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** ची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सदर **राष्ट्रीय फेरीवाला धोरण** मधील **परिच्छेद क्र. ४.५.१** मधील तरतूदीनुसार आपल्या क्षेत्रात महानगरपालिका/नगरपालिका शहर फेरीवाला समिती स्थापन करावी तसेच ज्या शहरांचे/नगरांचे महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्र मोठे असेल अशा मोठ्या क्षेत्राकरीता १ पेक्षा जास्त फेरीवाला समिती गठीत करता येईल. सदर समितीवर प्रवर्ग १ मधील शासनाने नियुक्त करावयाच्या सदस्यांची यादी सोबतच्या विवरण पत्रात दिली आहे.

२. प्रत्येक शहर फेरीवाला समिती ही विविध संघटनांच्या प्रतिनिधींची व फेरीवाला संघटनांचे प्रतिनिधींची मिळून बनलेली असेल ज्यामध्ये नियुक्त करावयाच्या फेरीवाला संघटनांच्या प्रतिनिधींपैकी **३०% महिला** असतील.

३. सदर समितीवरील विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच फेरीवाला यांच्या प्रतिनिधींची निवड ही शहर फेरीवाला समितीद्वारे निश्पक्ष व पारदर्शी तंत्राद्वारे करण्यात येईल.

४. सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ०२ महिन्याच्या विहीत कालावधीमध्ये फेरीवाला समिती स्थापन करण्याची कार्यवाही संबंधित महानगरपालिकेने/नगरपालिकेने पूर्ण करावी.

५. शहर फेरीवाला समितीने आपले कामकाज **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील तरतूदीनुसार काटेकोरपणे पार पाडावे तसेच घेण्यात आलेले निर्णय पुढील एक आठवडयाच्या कालावधीत प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीया द्वारे प्रसिद्ध करावेत.

६. शहर फेरीवाला समितीस या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींच्या मदतीने महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्राचे फेरीवाला क्षेत्र उपक्षेत्रामध्ये विभागणी करता येईल तसेच **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील **परिच्छेद क्र. ४.२ (B) आणि (C)** नुसार फेरीवाला क्षेत्राची विभागणी करण्याबात कार्यवाही करावी.

७. **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील **परिच्छेद क्र ४.५.४** मधील तरतूदीनुसार सर्व फेरीवाल्यांचे नोंदणीकरण करावे. नोंदणीकरणानंतर फेरीवाल्यास शहर फेरीवाला समिती विहीत करेल अशा क्षेत्रामध्ये काम करण्याचे अधिकार प्राप्त होतील.



Generated by CamScanner from intsig.com

८. सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ०४ महिन्यांच्या विहीत कालावधीमध्ये सर्व फेरीवाल्यांचे नोंदणीकरण करण्याची कार्यवाही महानगरपालिका / नगरपालिका यांनी पूर्ण करावी.

९. महानगरपालिका / नगरपालिकांनी व स्थानिक प्राधिकरणांनी **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत.

१०. शहर फेरीवाला समितीची बैठक प्रत्येक महिन्यात घेण्यात यावी. परंतु आवश्यकतेनुसार अध्यक्षांना तातडीची बैठक बोलविता येईल तसेच सदर समितीने **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील तरतूदीची अंमलबजावणी (विशेषत्वाने परिच्छेद क्र. ४.५.१ **(बी)** आणि **(सी)**) होईल याची खबरदारी घ्यावी.

११. **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** व फेरीवाला संदर्भातील महानगरपालिका / नगरपालिका नियमात काही वाद निर्माण झाल्यास **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील तरतूदी लागू राहतील.

१२. **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील तरतूदीनुसार सर्व फेरीवाल्यांचे नोंदणीकरण व फेरीवाला क्षेत्र निर्माण करण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रांमध्ये सद्य:स्थितीत कार्यरत असणाऱ्या फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास अनुमती द्यावी. वरील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर फेरीवाल्यांना केवळ संबंधित शहर फेरीवाला समितीच्या आदेश/निदेशानुसार फेरीवाल्यांना व्यवसाय करता येईल.

१३. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०९ सप्टेंबर, २०१३ च्या आदेशाची अंमलबजावणी विहीत मुदतीमध्ये महानगरपालिका/नगरपालिकांनी **तात्काळ** करावी.

१४. महापालिका आयुक्तांनी एका उप आयुक्तांची व मुख्य अधिकाऱ्यांनी एका अधिनस्थ अधिकाऱ्यांची निमंत्रक ( Convener) म्हणून नियुक्ती करावी.

सदरहू आदेशांची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

गो. आ. लोखंडे

**(गो. आ. लोखंडे)**
**उप सचिव (नगर विकास विभाग)**

**प्रत,**

१. आयुक्त, सर्व महानगरपालिका
२. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
३. मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका
४. निवडनस्ती नवि-३४

Generated by CamScanner from intsig.com

# शासन निर्णय क्र. राफेधो-२०१३/प्र.क्र. ३९/नवि-३४ चे विवरण पत्र

**राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मधील परिच्छेद ४.५.१ मध्ये शहर फेरीवाला समितीची रचना विहीत केली आहे. त्यानुसार सदर समितीवर एकूण चार प्रकारच्या विविध प्रवर्गातील प्रतिनिधींची सदस्य म्हणून नियुक्त करावयाची आहे. सदर समितीवर नियुक्त करावयाच्या विविध प्रवर्गातील सदस्य व त्यांची संख्या पुढीलप्रमाणे विहीत केली आहे---

## शहर फेरीवाला समिती

| अ.क्र. | सदस्यांचा प्रकार (प्रवर्ग) | सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | स्थानिक प्राधिकरण, नियोजन प्राधिकरण, पोलीस व इतर अशा प्रवर्गाचे प्रतिनिधी | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान २०% इतके सदस्य या प्रवर्गातील असतील. |
| २. | फेरीवाला संघटनांचे प्रतिनिधी | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान ४०% इतके सदस्य फेरीवाला संघटनांचे प्रतिनिधी असतील. |
| ३. | रेसिडेन्ट वेलफअर असोसियेशन्स, समुदाय आधारीत संघटना (कम्युनिटी बेस ऑरगनायजेशन्स) | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान २०% इतके सदस्य या प्रवर्गातील असतील. |
| ४. | इतर नागरी (सिव्हील) संस्था संघटना, जशा NGO, व्यवसायिक समुहातील प्रतिनिधी (जसे वकील, डॉक्टर, नगर रचनाकार, आरकिटेक इत्यादी) व्यापार व वाणिज्य समुहाचे प्रतिनिधी, शेडयुल बँकांचे प्रतिनिधी व महत्वाचे नागरीक (eminent citizens) | शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान २०% इतके सदस्य या प्रवर्गातील असतील. |

शहर फेरीवला समितीवरील नियुक्त करावयाच्या फेरीवाला संघटना, रेसिडेन्ट वेलफअर असोसिएशन व इतर नागरी संस्था संघटना या प्रवर्गातील एकूण सदस्यांच्या संख्येपैकी किमान १/३ सदस्य या महिला असल्या पाहिजेत.

**राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९** मध्ये परिच्छेद ४. ५. १ शहर फेरीवाला समितीची रचना विहीत केली असून त्यानुसार विविध चार प्रवर्गातील प्रतिनिधींची सदस्य म्हणून नियुक्ती करावयाची आहे. वर नमूद तक्त्यातील प्रवर्ग २ मधील फेरीवाला संघटनांच्या प्रतिनिधींची संख्या ही फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान ४०% इतकी असली पाहिजे व उर्वरीत ३ प्रवर्गातील प्रतिनिधींची संख्या ही प्रत्येकी २०% या समप्रमाणात असली पाहिजे.



Generated by CamScanner from intsig.com

राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ मधील परिच्छेद ४.५.१ नुसार शहर फेरीवाला समितीवर शासनाकडून पहिल्या प्रवर्गातील एकूण ०६ सदस्य पुढीलप्रमाणे निर्देशीत करण्यात येत आहेत--

## अ वर्ग महानगरपालिका

### मुंबई महानगरपालिका शहर फेरीवाला समिती

१. अध्यक्ष : आयुक्त, मुंबई महानगरपालिका
२. सदस्य : महानगर आयुक्त, मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण
३. सदस्य : पोलीस आयुक्त, मुंबई
४. सदस्य : सहपोलीस आयुक्त, (वाहतूक) मुंबई
५. सदस्य : मुख्य अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल, मुंबई महानगरपालिका
६. सदस्य : कार्यकारी आरोग्य अधिकारी, मुंबई महानगरपालिका

### मुंबई महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समिती

१. अध्यक्ष : सहायक आयुक्त/ प्रभाग अधिकारी
२. सदस्य : कार्यकारी अभियंता, नियोजन विभाग
३. सदस्य : प्रभाग वैद्यकीय अधिकारी
४. सदस्य : पोलीस आयुक्त, मुंबई यांनी नियुक्त केलेले सहायक पोलीस आयुक्त
५. सदस्य : पोलीस निरीक्षक (वाहतूक)

### ब, क व ड वर्गातील महानगरपालिकेतील शहर फेरीवाला समिती

१. अध्यक्ष : महानगरपालिका आयुक्त
२. सदस्य : पोलीस आयुक्त
३. सदस्य : सहायक संचालक, नगररचना महानगरपालिका
४. सदस्य : स्थानिक प्राधिकरणाचे प्रमुख/अधिकारी
५. सदस्य : सहपोलीस आयुक्त, (वाहतुक)
६. सदस्य : आरोग्य अधिकारी, संबंधित महानगरपालिका



Generated by CamScanner from intsig.com

## महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समिती

| | | |
|---|---|---|
| १. अध्यक्ष | : | प्रभाग अधिकारी/महानगरपालिका आयुक्त यांनी निर्देशित केलेले वरिष्ठ अधिकारी (उप आयुक्त/सहायक आयुक्त यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेले) |
| २. सदस्य | : | कार्यकारी अभियंता, नगररचना विभाग |
| ३. सदस्य | : | मुख्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका यांचे प्रतिनिधी |
| ४. सदस्य | : | पोलीस आयुक्त, यांनी नियुक्त केलेले सहायक पोलीस आयुक्त |
| ५. सदस्य | : | पोलीस निरीक्षक (वाहतूक) |

## नगरपालिका शहर फेरीवाला समिती

| | | |
|---|---|---|
| १. अध्यक्ष | : | मुख्याधिकारी, नगरपरिषद |
| २. सदस्य | : | नगररचनाकार |
| ३. सदस्य | : | वैद्यकीय अधिकारी (ग्रामीण किंवा कॉटेज हॉस्पिटल) |
| ४. सदस्य | : | वरीष्ठ पोलीस निरीक्षक |
| ५. सदस्य | : | पोलीस निरीक्षक (वाहतूक) |

महानगरपालिका आयुक्त/मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. ०९ सप्टेंबर, २०१३ चे आदेश विचारात घेवून **राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ मधील परिच्छेद ४.५.१** मध्ये विहीत केल्यानुसार शहर फेरीवाला समितीवरील उर्वरीत प्रवर्गातील सदस्यांची नियुक्ती करावी.

आयुक्त, मुंबई महानगरपालिका तसेच उर्वरीत ब.क व ड वर्ग महानगरपालिका आयुक्त यांना केंद्र शासनाच्या अखत्यारीतील प्राधिकरणे जसे- रेल्वे, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या प्रतिनिधींची विशेष निमंत्रित म्हणून समितीवर नियुक्ती करता येईल तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचे रस्ते असल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिनिधीचो सदस्य निमंत्रित म्हणून समितीवर नियुक्ती करता येईल.

****************************************



Generated by CamScanner from intsig.com